**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' अनुक्रमे दि.१७.०७.२००८, २६.११.२००८,२९.०१.२००९,२४.२.०९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ.क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०५४ /पुणे | श्री.व्ही.एन.कणसे श्री कृष्ण गोपाळ बिल्डिंग नं.१,ब्लॉक नं.७, श्री तेज को ऑप हौसिंग सोसायटी, गोखलेनगर, पुणे-१६ | मिळकत व्यवस्थापक, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, आगरकरनगर, पुणे-१ | मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, आगरकरनगर, पुणे-१ | श्री तेज सह.गृहनिर्माण संस्थेकडे एच-१ या इमारतीचे अभिहस्तातंरण करुन देणेबाबत | अपीलकर्त्याची मूळ मागणी ही प्रशासकीय कार्यवाही संबंधित आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| २ | १८५० /पुणे | श्री.मधुकर भिवा कोकणे प्रियदर्शनी नगर, गल्ली क्र.४, राधाकृष्ण मंदिरासमोर, जुनी सांगवी, पुणे-२७ | उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (२), पुणे | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे | सन २००१ ते २००७ या कालावधीतील पुणे शहर आदिवासी सह संस्था सांगवी लेखा परिक्षण या संस्थेच्या अहवालाच्या प्रती | आपली कोणतीही तक्रार नसल्याचे अपीलकर्त्याने दि.१८.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर यांना कळविले होते ही बाब त्यांनी दि.१०.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २३७५ /पुणे | श्री.यशवंत गंगाधर पटवर्धन रा.९, यशश्री अपार्टमेंट, कोहिनूर कॉलनी, सहकारनगर क्र.२, पुणे-९ | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे | श्री.गणेश दामोदर पटवर्धन यांच्या नावे असलेली तिकोणे, ता.मावळ येथील स.नं.४ व ५ १९६६ पर्यंत त्यांचे नावे होता सध्याचे मालकाचे नाव व ज्या कागदपत्रामुळे झाले याबाबत माहिती | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दोन दिवसात माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | १९१०/ पुणे | श्री.निलेश चंद्रकांत पांगारे रा.दिवळे, ता.भोर, जि.पुणे | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, दिवळे, ता.भोर, जि.पुणे | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, भोर, जि.पुणे | ग्रामपंचायत, दिवळे यांच्या हद्दीत असणाऱ्या एकूण बखळ जागा, जागेचे मालक, मिळकत नंबर क्षेत्र व या जागेची नोंद कशाच्या आधारे घेतली, याबाबत माहिती | आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) वरील सर्व अपिले अनुक्रमांक १ ते ४ (क्रमांक १०५४, १८५०,२३७५ व १९१०) निकाली काढण्यात येत आहेत.

२) विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयपक्षी एकमत झाले असे अपिलांमध्ये नमूद केले आहे त्यानुसार केलेल्याकार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. 30-०४-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अजित विष्णू रानडे
१६२६, सदाशिव पेठ, राधारामकृष्ण को.ऑप.हौ.सोसायटी
गोपाल गायन समाज रोड, पुणे-३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, उत्तरवादी
पुणे महाागरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना (बांधकाम नियंत्रण),
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८३ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे सौ. हर्षदा वि.शिंदे

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग,
पुणे महाागरपालिका, पुणे तर्फे प्रतिनिधी श्री. प्रवीण गेडाम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.५.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.७.२००७ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

डी.आर.सी. मंजुर करण्यात आलेल्या फाईलमधील सर्व खात्यांच्या अभिप्राय, ठरावासहीत सर्व कागदपत्रांच्या नकला, डी.आर.सी. कार्ड मधील ऊर्वरित क्षेत्रापैकी काही क्षेत्र घेतले आहे, त्याकरिता कोणती कागदपत्रे जमा करावीत याबाबत माहिती, तसेच डी.आर.सी. मधील ऊर्वरित क्षेत्र वापरता येत नसल्यास त्याबाबतचे आदेशाच्या सही शिक्क्यासह नकला

## विवेचन

विकास हक्क दाखला तथा डी.आर.सी. ००२४३४ मधील ऊर्वरित क्षेत्र वापरता येते की नाही, याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. अजित विष्णू रानडे यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कळविलेले शुल्क भरल्यानंतर आपल्याला डी.आर.सी. ऐवजी अन्य अकरा प्रकरणातील टी.डी.आर. ची _माहिती देण्यात आली. त्याविरूध्द अपील केल्यानंतर अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या आदेशानुसार संपूर्ण फाईलची छायांकित प्रत आपल्याला मिळाली. परंतु विषयांकित डी.आर.सी. मधील ऊर्वरित क्षेत्र वापरता येत नसल्यास त्या प्रकारचे आदेश असल्यास त्याची सही शिक्क्यासह नक्कल मिळावी, या आपल्या मागणीची पूर्तता झाली नाही, या कारणावरून श्री. रानडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

मूळ विषयाशी संबंधित नसलेली माहिती आपल्याला देण्यात आली. मूळ विकास हक्क दाखला (डी.आर.सी.) विकास अभियंता व महानगरपालिका आयुक्त, पुणे यांच्या सहीने दि. १६.५.२००० रोजी कुलमुखत्यारपत्रधारक श्री. संदीप महाजन यांच्या नावाने दिला आहे. तो हस्तांतरणीय दाखला आहे. या डी.आर.सी. कार्डमधील ऊर्वरित क्षेत्रापैकी काही क्षेत्र आपण घेतलेले आहे, परंतु महानगरपालिका आयुक्तांनी बंदी घातली असल्यामुळे ही डी.आर.सी. वापरता येणार नाही, असे पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विभागातील अधिकारी गेली ३/४ वर्षे तोंडी सांगत होते. आयुक्तांच्या या अशा आदेशाची प्रत आपल्याला मिळाली नाही. झोपडपट्टी पुनर्वसनाच्या नियमावलीबाबतचा खुलासा आपल्याला देण्यात आला, त्याचा २००० सालच्या डी.आर.सी. शी काय संबंध आहे ? श्री. संदीप महाजन यांचे बांधकाम विभागाशी लागेबांधे असून त्यामुळे आपल्याला माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन श्री. रानडे यांनी लेखी निवेदनात केले आहे.

श्री. रानडे यांनी या डी.आर.सी. मधून काही हक्क घेतले आहेत. त्यासाठी कोणती कागदपत्रे जमा करावीत येथपासून त्यांनी मागितलेली सर्व माहिती त्यांना देण्यात आली आहे. त्यांचा मुख्य प्रश्न ऊर्वरित क्षेत्र वापरण्याबाबतचा आहे. कोथरूड येथील झोपडपट्टी विकास योजने अंतर्गत ही डी.आर.सी. तयार झाली असून त्याबाबतचे शासन आदेश श्री. रानडे यांना देण्यात आले आहेत. ऊर्वरित क्षेत्र-

वापराबाबत महानगरपालिका आयुक्तांनी स्थगिती दिली होती, परंतु त्याची कागदपत्रे आढळून येत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने ०.४ टी.डी.आर. वापरावयाचा की नाही असा प्रश्न होता. प्रकरण दाखल केल्याशिवाय ऊर्वरित टी.डी.आर. दाखविता येत नाही, या पार्श्वभूमीवर विषयांकित डी.आर.सी. क्रमांक खर्ची टाकण्यासाठी आला नव्हता. आता त्यामध्ये निर्देश प्राप्त झाले असून प्रस्ताव दाखल केला तर तो टी.डी.आर. खर्ची टाकता येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सांगितले.

डी.आर.सी. २४३४ मधील क्षेत्र खर्ची टाकण्याकरिता नियमानुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर करण्याबाबत दि. १७.८.२००७ अन्वये श्री. रानडे यांना कळविले आहे. श्री. रानडे यांनी तसा प्रस्ताव दाखल केलेला नसल्यामुळे डी.आर.सी. क्षेत्र खर्ची टाकण्यात आले नाही. त्यांनी तसा प्रस्ताव दाखल केल्यास तो खर्ची टाकण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना, पुणे महानगरपालिका यांनी आयोगाला दि. ८.९.२००८ रोजी सादर केलेल्या निवेदनाद्वारे नमूद केले आहे.

वरील बाबी लक्षात घेता श्री. रानडे यांचा मुख्य विषय डी.आर.सी. वापराबाबतचा होता व त्याबाबतचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेले आहे. मात्र माहिती नेमकेपणाने दिली जाणे आवश्यक आहे. तसेच महानगरपालिका आयुक्तांनी दिलेल्या स्थगिती आदेशा सारख्या महत्त्वाच्या निर्णयाबाबत लेखी माहिती महापालिकेच्या अभिलेखात नमूद असणे व ती नागरिकांना उपलब्ध असणे आवश्यक आहे, याची समज संबंधितांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**पुणे**
**दि. २२.४.२००९**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ — stamp)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.एम.एम.सरखाझी
७०४, हलीमी बिल्डिंग नं.१, लिलीयानगर,
गोरेगाव (पश्चिम), मुंबई-४०००६२

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९ / सोलापूर तक्रार /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.६.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.एम.एम.सरखाझी
७०४, हलामी बिल्डिंग नं.१, लिलीयानगर,
गोरेगाव (पश्चिम), मुंबई-४०००६२

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर श्री.अशोक भांडवलकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर श्री.एस.यू.शिरपूरकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सोलापूर विणकर औद्योगिक सहकारी वसाहत नियमित, सोलापूर या सोसायटीच्या लिलाव, मूल्यांकन प्रमाणपत्र, जुलै २००४ ते जुलै २००६ मध्ये अवसायकाने केलेला खर्च (मान्यतेसाठी पाठविलेला), | |

## विवेचन

सोलापूर विणकर औद्योगिक सहकारी वसाहत नियमित, सोलापूर या संस्थेच्या मालमत्ता विक्रीच्या संदर्भात मागितलेली माहिती अवसायकांनी पूर्ण दिली नाही, दिली ती चुकीची दिली. २४१ दिवसांत, तीन टप्प्यांत व तीही अपूर्ण माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली. भ्रष्टाचार स्पष्ट असतानाही अपिलीय प्राधिकारी यांनी कोणतीही कारवाई केली नाही, या कारणावरुन अपीलकर्ता श्री.एम.एम.सरखाझी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सोलापूर विणकर औद्योगिक सहकारी वसाहत नियमित, सोलापूर ही संस्था दि.१६.७.२००७ रोजी अवसायकात घेऊन सहकार खात्याने अवसायक म्हणून सहाय्यक सरकारी अधिकारी श्री.एम.एस.निगेवान यांची नेमणूक केली. त्यांनी दि.१५.९.२००४ रोजी संस्थेचा दप्तरी पदभार व दि.१३.१२.२००४ रोजी संस्थेच्या स्थावर जंगम मालमत्तेचा ताबा घेतला. संस्थेची इमारत, जमीन, यंत्रसामग्री आदी मालमत्ता १० लाख ११ हजार रुपयांना खरेदी करण्याचे आपण मान्य केले होते, त्यापोटी एक लाख रुपये अनामत रक्कमही भरली होती. परंतु श्री.निगेवान यांनी हीच मालमत्ता रु.३ लाख ४१ हजार ६०१ रुपये एवढ्या कमी किमतीला विकली. आपण भरलेली रक्कम परत करण्याची मागणी केल्यानंतर आपल्याला २५०००/- रुपये परत दिले. परंतु

कागदपत्रात खाडाखोड करुन ३५०००/- रुपये दिल्याचे भासविले व बाकीची रक्कम परत देणे, पुरेसा निधी नसल्याचे कारण दाखवून नाकारले, असे श्री.सरखाझी यांनी आयोगाला सादर केलेल्या विविध कागदपत्रांमध्ये नमूद केले आहे. त्याचाच त्यांनी सुनावणीत पुनरुच्चार केला.

या विषयाबाबत श्री.सरखाझी विविध पातळ्यांवर व प्रदीर्घ काळ अर्ज, अपिले, तक्रारी करीत आले आहेत. माहितीच्या अधिकारात दोन अर्जांवर आपल्याला वेगवेगळी माहिती देण्यात आली. या दोन्ही माहितीत तफावत असल्यामुळे खरी माहिती कोणती, हे स्पष्ट होत नाही. श्री.निगेवान यांनी दिलेली माहिती व जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर श्री.आर.एस.दराडे यांनी दिलेली माहिती यातही तफावत आहे. श्री.निगेवान यांनी माहिती उपलब्ध नसल्याचे सांगून नाकारली. मात्र नंतरच्या अवसायकांनी चार दिवसात आपल्याला माहिती दिली. यावरुन माहिती न देण्याचा व दिशाभूल करण्याचा श्री.निगेवान यांचा उद्देश स्पष्ट होतो, असे प्रतिपादन श्री.सरखाझी यांनी केले. दि.४.११.२००६, दि.१३.१२.२००६ या तारखांना दिलेल्या माहितीत असलेली तफावत श्री.सरखाझी यांनी पुढीलप्रमाणे नमूद केली आहे :

| | **दि.४.११.२००६ रोजी दिलेली माहिती** | | **दि.१३.१२.२००६ रोजी दिलेली माहिती** |
|---|---|---|---|
| १ | संपूर्ण किंमत | रु.३,४१,६०१ | रु.३,४७,६०१ |
| २ | मशिनरी किंमत | रु.४३,५०० | रु.४९५०० |
| ३ | वॉचमनचा पगार | रु.१२,००० | रु.१२७५० |
| ४ | अवसायकाचे मानधन | रु.९००० | रु.१२००० |
| ५ | दाखविलेले व्यक्तीगत कर्ज | निरंक | लिलावाचे आधी ३०,८००<br>लिलावानंतर १४००० |
| ६ | रोख रक्कम | निरंक | रु.५८,३३२ |
| ७ | लिलाव रक्कम<br>बँकेत दि.३.२.२००६ पर्यंत जमा<br>जास्त रक्कम | ३,४१,६०१<br>३,५६,०००<br>१४,३३९ | तेरीजपत्राला लिलाव रक्कम ३१.३.२००५ रोजी ५८,४४३ एवढी होती. मग बँकेत रु.१,०५,००० कोठून भरले. |
| ८ | लिलावाची रक्कम | ३,४१,६०१ | रु.३,४७,६०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | झालेला खर्च | रु.३,४१,९१६ | रु.३,४४,३८५ |
| १० | शिल्लक | रु.३१५ | रोख रक्कम ३,२१६ |
| ११ | नवीन खाते उघडल्याची तारीख<br>विजेची बिले | ७.३.२००५<br>५६,११६ | खाते उघडले - १४.३.२००५<br>मंजूरीचे पत्र -९००० व जादा मानधन रु.३००० |
| १२ | श्री.सरखाझी याना दिलेली रक्कम<br>वॉचमनच्या पगारपत्रावरील सह्या खोट्या. वॉचमनला पगार जास्त महिन्याचा दिला. | २५,००० | खोडून ३५,००० केले. त्याप्रमाणे सर्व खोटी कागदपत्रे तयार केली. याबाबत भा.द.वि.४२०, ४६५, ४६८,४७१ अन्वये दि.१५.१२.२००६ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे. |
| १४ | रु.१ प्रमाणे जमिनीची किंमत केली | | याबाबत कायदेशीर बाबींची पूर्तता न करता लिलाव करण्यात आला. |

या अनुषंगाने श्री.सरखाझी यांनी केलेल्या तक्रारीबाबतचा खुलासा आठ दिवसांत सादर करण्याचा आदेश आयोगाने उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर यांना दिला होता. त्यानुसार, 'संस्था अवसायनात घेणेपूर्वी म्हणजे दि.१.११.२००० रोजी संस्थेचे चेअरमन श्री.पिट्टा व श्री.सरखाझी यांच्यामध्ये रु.२० चे स्टॅम्प व प्रॉपर्टी रु.१०.११ लाखास खरेदीचा व्यवहार झाल्याचे दिसून येते. सदर स्टॅम्पमध्ये नमूद केल्याप्रमाणे श्री.सरखाझी यांनी प्रॉपर्टी खरेदीपोटी रु.१.००लाख सोलापूर जिल्हा औद्योगिक बँकेत भरल्याचे बँकेकडील दि.५.७.२००४ चे (श्री.सरखाझी यांना उद्देशून लिहिलेल्या)पत्रावरुन दिसून येते. तथापि अवसायकांनी दि.५.३.२००५ रोजी सदर प्रॉपर्टी व मशिनरी जाहीर लिलावाने श्री.विनायक रा.कोड्याल, सोलापूर यांना अनुक्रमे रु.२,९९,१०१ व रु.४३,५०० एवढ्या किंमतीस विकलेली आहे, असे उपनिबंधक श्री.एस.यू.शिरपूरकर यांनी आयोगाला सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे. श्री.सरखाझी यानी संबंधित मालमत्तेच्या विक्रीच्या व्यवहाराबाबत घेतलेल्या आक्षेपांना पुष्टी देणारा असा हा अहवाल आहे(प्रत संलग्न). मूल्यनिर्धारित केलेल्या किमतीपेक्षा कमी किमतीला मालमत्ता विक्री केल्याचे उपनिबंधकानी या अहवालात मान्य केले आहे. ही माहिती व आधी दिलेली माहिती यातील तफावत लक्षात घेता दोघांपैकी कोणीतरी एक चुकीची माहिती देत आहे व अशी चुकीची माहिती देणाऱ्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी

श्री.सरखाझी यांनी निवेदनाद्वारे आयोगाकडे केली आहे. श्री.सरखाझी म्हणतात ती तफावत 'माहिती'तील नसून निर्धारित व प्रत्यक्षातील रकमांमधील अनियमितताची आहे.

फसवणूक, गैरव्यवहार, बनावट दस्तऐवज तयार करणे व हडेलहप्पी कारभार याद्वारे १० लाख रुपयांहून जास्त रकमेचा भ्रष्टाचार झाला. तसेच सर्व कायदे धाब्यावर बसवून झालेल्या या लिलावात आपल्यावर अन्याय झाला आहे. त्यामुळे हा संपूर्ण व्यवहार बेकायदेशीर ठरवून सर्वाधिक बोली असलेल्या खरेदीदाराला (म्हणजे श्री.सरखाझी यांना स्वत:ला) मालमत्ता द्यावी, अशी मागणी श्री.सरखाझी यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनामध्ये केली आहे. महितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अशा प्रकारच्या कार्यवाहीचा अंतर्भाव होत नाही.

'श्री.निगेवान यांची बदली होऊन १८ महिने होऊन गेले तरी नवीन अवसायक श्री.पी.आर.मोतीवाले यांना त्यांनी पदभार म्हणजे मूळ कागदपत्रे दिलेली नाहीत, म्हणून माहिती देता येत नाही. या संदर्भात त्यांना वारंवार पत्रे पाठवण्यात आली असून ते कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद देत नाहीत, त्यामुळे या व्यवहाराच्या संदर्भातील माहिती मागणारे अर्ज व तक्रारी यांचे निराकरण करणे व माहिती देणे शक्य होत नाही,' असे उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर श्री.आर.एस.दराडे यांनी दि.७.१०.२००६ राजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांना लिहिलेल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे. तसेच श्री.निगेवान यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर व विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे यांना अनुक्रमे दि.७.१०.२००६ व दि.१५.१२.२००६ रोजी केली आहे. परत दिलेल्या रकमेच्या चेकमधील रु.१०,००० ना फसविले असल्यास त्या संदर्भात सक्षम न्यायालयात दाद मागावी,असे उपनिबंधकांनी श्री.सरखाझी यांना दि.१२.२.२००७ रोजी कळविले आहे.

वरील बाबी संदर्भात श्री.निगेवान सुनावणीत कोणतेही स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत. नंतरही त्यांनी कोणताही खुलासा केलेला नाही.

श्री.सरखाझी यांचा आक्षेप मालमत्ता कमी किमतीला विकल्याचा व आपल्याला न देण्याबद्दलचा, तसेच त्या अनुषंगाने तत्कालीन अवसायक श्री.एम.एस.निगेवान यांनी केलेल्या अनियमिततेबद्दलचा आहे. अनियमितता वा बेकायदेशीरपणा ही स्वतंत्र बाब आहे. कागदपत्रानुसार माहिती देण्यात आली आहे. या रकमेच्या व व्यवहाराच्या योग्य-अयोग्यतेचा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. मात्र या सर्व माहितीला जबाबदार असणारे तत्कालीन अवसायक श्री.एम.एस.निगेवान यांनी या तफावतीबाबतचे व काही कागदपत्रांच्या प्रती न पुरविल्याबाबतचे स्पष्टीकरण तीन दिवसांत आयोगाला सादर करावे व त्याची प्रत अपीलकर्त्याला द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. परंतु सहा महिने होऊनही त्याची पूर्तता श्री.निगेवान यांनी केलेली नाही.

वरील बाबी लक्षात घेता

अ) कागदपत्राचे जतन न करणे

ब) शासकीय अभिलेख पदभाराच्या सोबत सुपूर्त न करुन सार्वजनिकरीत्या उपलब्ध असणे आवश्यक असलेली माहिती नागरिकांपासून व शासनापासून लपविणे

क) नागरिकांना माहिती उपलब्ध करुन न देणे, म्हणजेच माहिती नाकारणे व शासकीय कारभारातील पारदर्शकतेच्या तत्त्वाचा भंग करणे.

याबद्दल श्री.एम.एस.निगेवान दोषी ठरतात व म्हणून ते शास्ती व शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतात.

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागितलेली माहिती न देणे, शासकीय कामकाजाशी संबंधित माहिती व दस्तऐवज नागरिकांपासून दडवून ठेऊन माहिती नागरिकांना उपलब्ध होऊ न देणे, व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अभिप्रेत असलेल्या सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या आणि उत्तरदायित्त्वाच्या तत्त्वाचा

भंग करणे याबद्दल श्री.एम.एस.निगेवान यांना रु.२५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. श्री.निगेवान यांच्याकडून ही शास्ती बसूल करुन ती दि.१५.५.२००९ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांनी करावी. तसेच याची नोंद श्री.एम.एस.निगेवान यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांनी तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(३) सार्वजनिक विषयातील मूळ शासकीय कागदपत्रे पदभारासोबत सुपूर्त न करुन माहितीपासून शासनाला व नागरिकांना वंचित ठेवण्याबद्दल श्री.एम.एस.निगेवान यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्यक आहे. उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर श्री.आर.एस.दराडे यांनी दि.७.१०.२००६ व दि.१५.१२.२००६ नुसार तशी शिफारस केली आहे. अशी कारवाई करुन विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे यांनी दि.२५.५.२००९ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा. तसेच याचीही नोंद श्री.एम.एस.निगेवान यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांनी तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२०.४.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रफुल्ल विष्णू सोमण
ॲड.विजापुरे, अं-११, महिम्न सोसायटी,
भाग्यश्री बिल्डिंग, कर्वेनगर, पुणे-५२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२७ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रफुल्ल विष्णू सोमण
ॲड.विजापुरे, अं-११, महिम्न सोसायटी,
भाग्यश्री बिल्डिंग, कर्वेनगर, पुणे-५२

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ प्रतिनिधी श्री.प्रवीण गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ प्रतिनिधी श्री.जगदीश खानोरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.७.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सिध्दकला सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, प्लॉट नं.१४, स.नं.१३४/२ वारजे, पुणे-२९ या मिळकतीबाबतची माहिती. श्री.सेवेकरी यांना बांधकाम पाडण्यासाठी दिलेल्या नोटिशीची प्रत, | |

## विवेचन

सिध्दकला सहकारी गृहरचना संस्थेतील बेकायदेशीर बांधकाम पाडण्याबाबत पुणे महानगरपालिकेने श्री.निशाद सेवेकरी यांना दिलेल्या नोटिशीवरील कारवाईची माहिती जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, पुणे महानगरपालिका,पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका,पुणे यांच्या पातळीवर अपूर्ण, असत्य व दिशाभूल करणारी मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.प्रफुल्ल विष्णू सोमण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.सेवेकरी यांना बांधकाम विभागामार्फत दिलेल्या नोटिशीची प्रत, तसेच जागेवरील विनापरवाना बांधकामाच्या पंचनाम्याची आणि छायाचित्रांची प्रत आपण मागितली होती. परंतु अशी संपूर्ण माहिती मिळालेली नाही, असे प्रतिपादन श्री.सोमण (वय ८८ वर्षे) यांचे वकील ॲड.जयराज रामचंद्र विजापुरे यांनी केले. श्री.सोमण यांना शुल्क भरल्यानंतर ही सर्व माहिती देण्यात आली आहे. श्री.सोमण यांनी दिलेली त्याची पोहोच खात्याकडे आहे, असे जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, पुणे महानगरपालिका,पुणे श्री.जगदीश खानोरे यांनी नमूद केले. मात्र श्री.सेवेकरी यांनी दिलेली माहितीच महानगरपालिका अधिकाऱ्यांनी जागेची प्रत्यक्ष पाहणी व पडताळणी न करता आपल्याला दिली आहे, बेकायदेशीर बांधकामाचे क्षेत्रफळ २०X८ चौ.फूट असताना सेवेकरी यांच्या सांगण्यानुसार १०X८ चौ.फूट असे क्षेत्रफळ दिले आहे. छायाचित्रे त्याच ठिकाणची असल्याचा पुरावा नसल्यामुळे दिशाभूल करणारी आहेत, असे प्रतिपादन ॲड.विजापुरे

यांनी केले. मात्र जन माहिती अधिकारी श्री.जगदीश खानोरे यांनी ते अमान्य केले. श्री.सेवेकरी यांनी स्वत: विनापरवाना बांधकाम काढले असून तसे श्री.सोमण यांना कळविण्यात आले आहे. प्रत्यक्ष जागेवर जाऊन त्याची खात्री खात्यामार्फत करुन घेण्यात आली असून श्री.सोमण यांना ते दाखविता येईल, असे श्री.जगदीश खानोरे व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.प्रवीण गेडाम यांनी सांगितले.

बेकायदेशीर बांधकाम पाडण्याची मागणी हा प्रशासकीय कारवाईचा भाग असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र त्या अनुषंगाने मागितलेली माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे व तशी ती देण्यात आली आहे, असे उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे यावरुन स्पष्ट होते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१.४.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.कौस्तुभ दत्तात्रय गोखले
सिध्दीविनायक प्रसाद, डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी रोड,
डोंबिवली (पू) ४२१२०१, ता.कल्याण, जि.ठाणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३१५ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कौस्तुभ दत्तात्रय गोखले
सिध्दीविनायक प्रसाद, डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी रोड,
डोंबिवली (पू) ४२१२०१, ता.कल्याण, जि.ठाणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ प्रतिनिधी श्री.प्रविण गेडाम

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,<br>बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.श्याम ढवळे | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.७.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पुणे महानगरपालिका परिक्षेत्रात एकूण अधिकृत व अनधिकृत बांधकामे किती याची प्रभागनिहाय विगतवारी मिळावी. | |

## विवेचन

पुणे महानगरपालिका क्षेत्रातील अधिकृत व अनधिकृत बांधकामांबाबतची संख्यात्मक माहिती अपीलकर्ता श्री.कौस्तुभ दत्तात्रय गोखले यांनी मागितली होती. मालमत्ता कराची आकारणी करताना पुणे महानगरपालिका कर आकारणी व करसंकलन विभागाकडे अधिकृत व अनधिकृत बांधकामाची नोंद ठेवण्यात येत नाही. सदरची माहिती आपल्याला नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांच्याकडे उपलब्ध होऊ शकेल, असे उत्तर सहाय्यक कर आकारणी व करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका यांनी दिले. त्याविरुध्द श्री.गोखले यांनी अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे अपील केले. उपलब्ध असलेली सर्व माहिती कर आकारणी व करसंकलन विभागाकडून घेऊन सहा.अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग श्री.गोडसे यांनी श्री.गोखले यांना त्वरित द्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.प्रशांत वाघमारे यांनी दिला. आपल्या विभागाकडील माहिती जमा करण्यात आली

असल्याचे श्री.गोडसे यांनी सांगितल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निकालपत्रात नमूद केले आहे. परंतु ही माहितीही आपल्याला देण्यात आली नाही. त्याबाबत दिलेल्या पत्राची नगरअभियंता यांनी दखल घेतली नाही, म्हणून श्री.गोखले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अशाच प्रकारची प्रभागनिहाय माहिती आपण ठाणे महानगरपालिकेकडे मागितली होती. मालमत्ता कराची आकारणी करताना महानगरपालिकेच्या करवसुली विभागाकडून अधिकृत व अनधिकृत बांधकामाची माहिती ठेवण्यात येते, असे ठाणे महानगरपालिकेच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी कळवून आपल्याला माहिती दिली. अशा प्रकारची माहिती ठाणे महानगरपालिका ठेवते आणि पुणे महानगरपालिका मात्र ठेवली जात नसल्याचे सांगते, याचा अर्थ हेतुपुरस्सररीत्या माहिती टाळली जाते, असे प्रतिपादन श्री.गोखले यांनी लेखी निवेदनात केले आहे. कोणतीही माहिती श्री.गोखले यांना दिलेली नसल्याचे जन माहिती अधिकारी श्री.श्याम ढवळे व अपिलीय प्राधिकारी श्री.प्रशांत वाघमारे यांचे प्रतिनिधी श्री.प्रविण गेडाम यांनी मान्य केले. त्याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण ते देऊ शकले नाहीत.

श्री.गोडसे यांनी विभागाकडील माहिती तयार असल्याचे दि.५.११.२००७ रोजी नमूद केले होते. ही माहिती अपीलकर्त्याला देण्यात आलेली नाही व जन माहिती अधिकारी श्री.श्याम ढवळे, तसेच अपिलीय प्राधिकारी श्री.प्रशांत वाघमारे यांनी याबाबत कोणतीही दखल घेऊन कार्यवाही केलेली नाही. ही बाब माहितीच्या अधिकाराबद्दल गांभीर्याचा अभाव व अनास्था असल्याचे दर्शविणारी आहे. श्री.गोडसे यांच्याकडे तयार असलेली माहिती सुनावणीच्या दिवशीच द्यावी व करसंकलन विभागाकडून मागितलेली माहिती चार दिवसात द्यावी, असा तोंडी आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. परंतु संबंधित माहिती दि.२६.८.२००८ रोजी श्री.गोखले यांना पाठविण्यात आल्याचे व तेही आयोगाने विचारणा केल्यानंतर अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.प्रशांत वाघमारे यांनी दि.५.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले. यातही गांभीर्याचा अभाव स्पष्ट दिसतो. अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

श्री.प्रशांत वाघमारे व सुनावणीला उपस्थित असलेले त्यांचे प्रतिनिधी श्री.प्रविण गेडाम यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या कक्षेतीलच माहिती असून ती दिली न जाण्याला-म्हणजेच पर्यायाने माहिती नाकारण्याला तेही जबाबदार ठरतात. याची पुनरावृत्ती झाल्यास त्यांच्यावरही शास्ती व अन्य कारवाई केली जाईल, याची समज त्यांना देण्यात येत आहे.

संबंधित माहिती करसंकलन विभागाकडे ठेवली जात नाही व ती नगरअभियंता यांच्याकडून उपलब्ध होईल, असे सहा.करआकारणी व करसंकलन प्रमुख कळवितात आणि अपिलीय प्राधिकारी असलेले नगरअभियंता ही माहिती करआकारणी व करसंकलन विभागाकडून घेण्याचा आदेश देतात. यावरुनही माहिती देण्याबाबत असलेली अनास्था चालढकल व टोलवाटोलवी दिसून येते. जी माहिती ठाणे महानगरपालिकेत सहजरीत्या ठेवली जाते ती पुणे महानगरपालिकेत ठेवणे का शक्य होत नाही, याचे उत्तर अधिकारी देऊ शकत नाहीत, हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अभिप्रेत असलेल्या सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या तत्वाशी विसंगत आहे.

माहिती उपलब्ध करुन न देणे व उपलब्ध असलेली माहितीही त्वरित न देणे याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शांताराम थोरा, तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आदेश दिलेले सहाय्यक अभियंता श्री.गोंडसे व करआकारणी व करसंकलन विभागातील प्रमुख, सहाय्यक करआकारणी व करसंकलन प्रमुख हे जबाबदार म्हणून शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.शांताराम थोरात, माहिती तयार असल्याचे सांगून व अपिलीय प्राधिकारी याच्या आदेशानंतरही माहिती न देणारे श्री.गोडसे यांच्यासह करआकारणी व करसंकलन विभागातील संबंधित माहिती न देण्यास जबाबदार

असणाऱ्या कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन आयुक्त, महानगरपालिका, पुणे यांनी त्यांच्याकडून रु.२५०००/- शास्ती समप्रमाणात वसूल करुन ती एप्रिल २००९ च्या मे २००९ मध्ये देय असलेल्या वेतनातून कपात करुन दि.१५.५.२००९ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी. तसेच याची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२८.४.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.** ४०८

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. भास्कर विठ्ठल करमरकर
रा.मधुबन अपार्टमेंट, अ-१५, समर्थ पथ,
कर्वे नगर, पुणे-५२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
नगर अभियंता (विद्यूत),
पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
नगर उप अभियंता (विद्यूत),
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३३४ + १९५७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.८.२००८ |

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| १३३४ / पुणे | दि. ३०.४.२००७ | दि. -- | दि. २०.६.२००७ | दि. २६.७.२००७ |
| १९५७ /पुणे | दि. ३०.४.२००७ | दि. -- | दि. २०.६.२००७ | दि. २६.७.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. भास्कर विठ्ठल करमरकर
रा.मधुबन अपार्टमेंट, अ-१५, समर्थ पथ, कर्वे नगर, पुणे-५२

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता
बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका यांचेतर्फे प्रतिनिधी
सौ.मनिषा रा. शेकटकर, सहाय्यक अभियंता

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सरकारी नेमणुकीचे पत्र व बढतीची पत्रे, सीईओ ९६ दि.१८.४.१९९६ नुसार आलेले प्रमाणपत्र, श्री. बापटसो यांनी दिलेला ठराव व त्याचे उत्तर, तसेच सेवाविषयक इतर अनुषंगिक माहिती

## विवेचन

कागदपत्र उपलब्ध न झाल्यामुळे आपल्या सेवानिवृत्तीवेतनाबाबत नुकसान होत असून त्या अनुषंगाने मागितलेली माहिती मिळत नसल्याच्या कारणावरुन श्री. भास्कर विठ्ठल करमरकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. करमरकर हे पुणे महानगरपालिकेच्या सेवेत होते. त्याआधी काही काळ त्यांनी शासनाकडे सेवा केली होती. दि. ३.८.१९८७ रोजी ते सेवेतून सहायक अभियंता (विद्युत) या पदावरुन निवृत्त झाले. आपल्या सेवेबाबतची कागदपत्रे आपण पुणे महानगरपालिकेकडे सादर केली होती. सेवानिवृत्तीवेतनाच्या पूर्ततेसाठी आपण या कागदपत्रांची मागणी करीत असूनही ती दिली जात नाही असे प्रतिपादन श्री. करमरकर यांनी केले. श्री. करमरकर यांनी पुणे महानगरपालिकेत दि.२१.७.१९६२ पासून सन १९८७ पर्यंत विविध खात्यात काम केले. त्यापूर्वी दि.२६.४.१९५५ ते दि.२०.७.१९६२ या कालावधीत ते राज्य शासनाच्या सेवेत होते. महानगरपालिकेच्या सेवेत येण्यापूर्वी कर्मचारी राज्य शासनाच्या सेवेत असेल तर त्याची ती सेवानिवृत्तीवेतनासाठी ग्राहय धरण्याचा महानगरपालिकेचा निर्णय आहे. परंतु सेवानिवृत्त होऊन वीस वर्षे होऊनही आपल्याला हा लाभ मिळालेला नाही, असे प्रतिपादन श्री. करमरकर यांनी केले.

श्री. करमरकर हा विषय सातत्याने महानगरपालिकेत विविध पातळ्यांवर मांडत आले आहेत. त्यांच्या शासकीय सेवेचे सेवा प्रमाणपत्र (अ फॉर्म ) आपल्या कार्यालयाकडे सादर करण्यात आलेले नाही, त्यामुळे तो कालावधी सेवानिवृत्ती वेतनासाठी समाविष्ट करणे शक्य झालेले नाही, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता (विद्युत), पुणे महानगरपालिका यांनी श्री. करमरकर यांना वेळोवेळी कळविले आहे.

जन माहिती अधिका-यांकडून पूर्ण माहिती न मिळाल्यामुळे श्री. करमरकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे अपील केले. श्री. करमरकर यांचा अर्ज सेवकवर्ग विभागाकडे पाठवावा व पुढील कार्यवाही सेवकवर्ग विभागाने करावी, असा

आदेश अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दिला. परंतु त्याबाबत पुढील काहीही कार्यवाही झाली नाही, असे श्री. करमरकर यांनी म्हटले आहे.

यांत्रिकी विभाग क्र.१ दापोडी येथे श्री. करमरकर शासकीय सेवेत होते. उपरोक्त कालावधीत यांत्रिकी मंडळ ( उ.स.) पुणे-४८० ००१ या कार्यालयात ते कार्यरत असल्याचे दिसून येते, असा सेवाप्रमाणपत्र दाखला यांत्रिकी मंडळाने जा.क्र.४१८७ दि. १५.१०.१९८७ रोजी दिला असल्याचे मुख्य अभियंता (यांत्रिकी) यांचेकडील जा.क्र. मुअयां /संकीर्ण /आ.२/२००३ दि. १९.६.२००७ च्या पत्रावरुन दिसून येते. सन १९५९ मध्ये श्री. करमरकर यांच्या सेवा सार्वजनिक आरोग्य विभागाकडून यांत्रिकी मंडळाकडे वर्ग करण्यात आल्या. ७ वर्षे २ महिने या शासकीय सेवेतील कालावधीपैकी ३ वर्षे २ महिन्यांची माहिती मिळाली व ऊर्वरित कागदपत्र दिली जात नाही, असे प्रतिपादन श्री. करमरकर यांनी केले. आपले सेवा पुस्तकही यांत्रिकी मंडळाकडेच असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र सेवापुस्तकाची जबाबदारी कर्मचाऱ्याची स्वत:ची आहे.

वरील बाबी लक्षात घेता सेवा प्रमाणपत्राच्या स्वरुपात श्री. करमरकर यांच्या सेवेबाबतची माहिती यांत्रिकी मंडळाने देणे आवश्यक आहे. यांत्रिकी मंडळाला तसे सुनावणीच्या दिवशीच कळविण्याच्या आयोगाच्या आदेशानुसार उपआयुक्त (तांत्रिक), पुणे महानगरपालिका, पुणे यांनी अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, (उ.स) पुणे-४११ ००१ यांना पत्राद्वारे कळविले. सदर कागदपत्रांची पूर्तता झाली नसून ती सत्वर व्हावी, असे उप आयुक्त (तांत्रिक), पुणे महानगरपालिका यांनी अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ.स.), पुणे-१ यांना पुन्हा दि. ३०.८.२००८ रोजी कळविले.

कर्मचा-याच्या सेवेबाबतची माहिती यांत्रिकी मंडळाने देणे आवश्यक आहे. त्याबाबतच्या आदेशानंतर सहा महिने होऊनही संबंधित माहिती दिली जात नसेल तर अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ.स.), पुणे-१ यांना याबाबत जबाबदार धरले जाईल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य.

२. श्री. भास्कर विठ्ठल करमरकर यांच्या यांत्रिकी मंडळातील सेवेबाबतची प्रमाणपत्राच्या स्वरुपातील माहिती अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ.स.), पुणे-१ यांनी त्वरित देऊन दि. २४.४.२००९ पर्यंत आयोगास अहवाल सादर करावा. याबातची पूर्तता न झाल्यास संबंधितांविरुध शास्तीची कारवाई करण्यात येईल.

पुणे
दि. ८.४.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ